# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०४/२०२४ (शनिवार) सकाळ**

---

## अपघातात जखमी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे केळवद:—** अंतर्गत मौजा सालई फाटा नागपुर ते पांढुर्णा जाणारा हायवे येथे दिनांक १२/०४/२०२४ चे ११.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— राहुल रमेश हिवरकर, वय २४ वर्ष, रा. तेलगंखेडी तह. सावनेर हे त्यांचे काका जख्मी नामे— रविंद्र हिवरकर यांची बजाज सिन १०० मोटर सायकल क्र. एम एच— ३१, बी एक्स ८५२२ या मोटर सायकलने जोगा माळेगाव येथुन नांदागोमुख—साल मार्गाने फिर्यादीचे मामाला सोडुन तेलंगखेडीला परत येत असतांना सालई फाटा येथुन नागपुर ते पांढुर्णा जाणारा हायवे क्रॉस करित असतांना नागपुर कडुन पांढुर्णा कडे जात असलेली सुझुकी ब्रिझा क्र. TG -09/0106 या वाहनाचे चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून फिर्यादीचे काकाचे मोटरसायकलला धडक देवून अपघात केला त्यामुळे त्याचे डोक्याला, नाकाला, डाव्या पायाला, गंभीर मार लागुन दुखापत झाली आहे. फिर्यादीचे काकाचे मोटर सायकला धडक देवून अपघात केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे केळवद येथे सुझुकी ब्रिझा क्र. TG -09/0106 चा चालक **आरोपी नामे— मुकेश चंदन चौधरी, वय ३२ वर्ष** याचेविरूद्ध कलम २७९, ३३८ भादंवी सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीस सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक गेडाम हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर